<u>नि.फौ.प्र.क.११५३/२०१७</u>
<u>सरकार वि. रेणू</u>
<u>निशाणी क्रमांक - ०८</u>

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक -०२</u>**

**<u>मी शपथेवर खरे सांगते की,</u>**

**माझे नाव :** माधुरी जयगोपाल खोब्रागडे
वय - ३८ वर्षे, व्यवसाय - नोकरी, एन.पी.सी.
कोतवाली पोलीस स्टेशन, नागपूर,
राह. गरोबा मैदान, नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहायक सरकारी वकील कु. आर. व्ही. चरडे यांचेमार्फत शपथेवर सुरू.</u>**

१) दि.१०.०६.२०१६ रोजी मी पोलीस स्टेशन लकडगंज येथे महिला पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होते. त्या दिवशी माझी सकाळी ०९.०० ते रात्री ०९.०० पर्यंत डयुटी होती. त्या दिवशी सायंकाळी ०५.३० वाजताच्यादरम्यान मला व इतर पोलीस कर्मचारी रमाकांत मेश्राम व ए.पी.आय. श्री. वानखेडे यांना गुंगा जमुना परिसरात रेड टाकायची असल्याबाबत सांगितले. आम्ही सर्व शासकीय वाहनाने त्या ठिकाणी गेलो. त्या परिसरात रस्त्याचया बाजुला ब-याच ठिकाणी काही महिला उभ्या राहून हातवारे करीत होत्या. त्या रस्त्यावरुन जाणा-या लोकांना इशारे करीत होत्या. तसेच जाणीवपूर्वक अंगप्रदर्शन करुन लोकांना बोलवित होत्या. त्यात आरोपी क्र.१ रेणू ही देखील होती. आम्ही तिला ताब्यात घेतले व पोलीस स्टेशनला आणले.

२) सदर महिलेला विचारपूस केली असता तिने सांगितले की, मी लक्ष्मीबाई हिच्या सपना बिडलींग मधील रुमवर मी ग्राहकांना वेश्या व्यवसायाकरीता बोलावते व माझी आई देखरेख करते. तिची अंगझडती घेतली असता तिच्याजवळ काहीही मिळून आले नाही. त्यानंतर आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला. सरांनी घटनास्थळी जावून घटनास्थळ पंचनामा तयार केला. मी आरोपींना ओळखते. आज

कोर्टात हजर असलेल्या दोन्ही आरोपी या त्याच आहेत.

**सरतपास संपला.**

**<u>उलट तपास आरोपींतर्फे ॲड. श्री. ए.आर. रावलानी यांचे मार्फत.</u>**

३) मी माझे बयाण देतेवेळी ए.पी.आय. रमाकांत मेश्राम हे आमच्या सोबत होते असे सांगितले नव्हते. मी बयाण देतेवेळी असेही सांगितले नव्हते की, रस्त्याच्या कडेला उभ्या राहून काही महिला या हातवारे करीत होत्या. मी बयाण देतेवेळी असेही सांगितले नव्हते की, आरोपी रेणू हिला ताब्यात घेवून पोलीस स्टेशनला आणले व तिची चौकशी केली. मी बयाण देतांना असेही सांगितले नव्हते की, आरोपी रेणू ही ग्राहक आणत होती व तिची आई तिथे देखरेख करीत होती. हे म्हणने खरे नाही की, असे काहीही घडले नव्हते म्हणून मी त्याबाबत बयाण देतेवेळी सांगितले नाही.

४) हे म्हणने खरे आहें की, पोलीस स्टेशन मधून रेड टाकणे कामी जात असतांना त्याबाबत स्टेशन डायरीला नोंद घेतली जाते. सदर प्रकरणात तशी स्टेशन डायरीला घेतलेली नोंद दाखल केली आहे किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. हे म्हणने खरे आहे की, डयुटीवर असतांना ज्या ठिकाणी आमची डयुटी लागते त्याबाबत हजेरीपटावर नोंद घेतली जाते. सदर प्रकरणात मी तसा कुठलाही दस्त तपासी अधिकारी यांना दिला नव्हता. हे म्हणने खरे नाही की, त्या दिवशी रेड करणेकाम कोणतेही आदेश मिळाले नव्हते. हे म्हणने खरे नाही की, त्यादिवशी मी डयुटीवर नव्हते.

५) ज्या रस्त्यावरुन जाणा–या लोकांना हातवारे करीत होती त्या लोकांचे बयाण तपासी अधिकारी यांनी घेतले होते की नाही याबाबत मला माहिती नाही. रेड टाकण्यापूर्वी त्या ठिकाणी बनावट

ग्राहक पाठवून त्या परिसरात तशा प्रकारचे कोणते काम होत आहे किंवा नाही याबाबतची चौकशी केली नव्हती. त्या दिवशी त्या घटनेचा व्हिडीओ बनविला नव्हता. हे म्हणने खरे नाही की, त्या दिवशी आरोपी त्या परिसरात रस्त्याच्या कडेला उभे राहून कोणत्याही व्यक्तीला हातवारे करीत नव्हती. हे म्हणने खरे नाही की, दोन्ही आरोपींविरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणने खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना त्या दिवशी झाली नाही. हे म्हणने खरे नाही की, सदर दोन्ही आरोपींचा या घ टनेशी कोणताही संबंध नाही.

**फेरतपास–काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत
समक्ष

(ए.पी. गिरडकर)
१५ वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
तथा अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

नागपूर.
दि.१०/०३/२०२३.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are word to word same as per original evidence.

Name of Stenographer : A.P. Dharmik